पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/५०४/२०२०
दिनांक - ०८/०५/२०२०

प्रति,

मा..........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा दिनांक **१३/०५/२०२०** रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार**, दिनांक **१३/०५/२०२०** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १७१**

**दिनांक - १३/०५/२०२०** **वेळ – दुपारी ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार,** दिनांक **१३/०५/२०२०** रोजी **दुपारी ०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक १८/०३/२०२०, ०६/०५/२०२० व ०८/०५/२०२० रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १६७ ) सभावृत्तांत कायम करणे.

आ) दिनांक २६/०३/२०२०, ०६/०५/२०२० व ०८/०५/२०२० रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १६८ ) सभावृत्तांत कायम करणे.

इ) दिनांक ०६/०५/२०२० व ०८/०५/२०२० रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १७० ) सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्याने/ आरक्षणाने बाधित जागा महापालिकेच्या ताब्यात घेणेबाबत दि.१९।०८।२०१९ रोजी मा.खाजगी वाटाघाटी समितीने मंजूरी दिलेल्या एकुण १७ विषयांकरीता मा.स्थायी समिती सभेची मंजूरी मिळणेकामी विषयपत्र मा.स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेले होते. सदर विषयांस अद्यापपर्यंत मा.स्थायी समिती सभेची मान्यता मिळालेली नाही. सदर विषय पत्रात नमूद केलेल्या अ.क्र.१ ते १७ पैकी अ.क्र.७ ते १२ हे विषय संबंधित मिळकतधारकांने खाजगी वाटाघाटीने रोख मोबदल्याऐवजी टि.डी.आर.व्दारे मोबदला मिळणेची मागणी केल्याने सदरच्या अ.क्र.७ ते १२ विषयी मा.टि.डी.आर.समितीने टि.डी.आर.देणेस मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे सदरचे अ.क्र.७ ते १२ हे विषय वगळून मा.स्थायी समितीपुढे विषय पत्र मंजूरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच दि.०४।०२।२०२० रोजी झालेल्या मा.खाजगी वाटाघाटी समितीने एकुण १२ विषयांकरीता मंजूरी दिलेली आहे. सदर प्रकरणी देखील येणा-या खर्चास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

अ) दि.१९।०८।२०१९ च्या मा. खाजगी वाटाघाटी समितीमध्ये मंजूर झालेले विषय

| अ.क्र | विषय | रस्ता/आरक्षण | क्षेत्र (चौ.मी) | मुल्याकंन र.रु |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे वाकड येथील स.नं. २३९।३ पैकी मधिल २४.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | २४.०० मी. रस्त्याने बाधित | १६०.०० चौ.मी | ६५,९२,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | मौजे रहाटणी येथील स.नं.२८/२ब पै. मधील ३०.००मी. एच.सी.एम.टी.आर. ने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | ३०.०० मी. एच.सी.एम.टी.आर | ११०.०० चौ.मी | ४२,५९,२००/- |
| ३ | मौजे सांगवी येथील स.नं. ८।१अ।१।१।१४अ मधील १८.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | १८.०० मी. रस्त्याने बाधित | १७५.५० चौ.मी | ४३,१४,३१६/- |
| ४ | मौजे चिखली येथील ग.नं. १५९४ पै मधील मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | १८.०० मी. रस्त्याने बाधित | १४३.३७ चौ.मी | २६,०९,३३४/- |
| ५ | मौजे चिखली येथील ग.नं. १५९४ पै मधिल मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | १८.०० मी. रस्त्याने बाधित | ७२.५० चौ.मी | १३,१९,५००/- |
| ६ | मौजे मोशी येथील नविन गट नं. ५०१ पै., (जुना गट नं. ५०१ पै.) मधिल मंजूर विकास योजनेतील ६०मी. रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | ६०.०० मी. रस्त्याने बाधित | २३७.५० चौ.मी | ३८,८५,५००/- |
| ७ | मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं. १८५।३।४७ पै, सि.स.नं. १५०९ पै मधिल मंजूर विकास योजनेतील आ.क्र. ३६९ (बस टर्मिनल) या प्रयोजनाने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | आ.क्र. ३६९ (बस टर्मिनल) | २८०.०० चौ.मी | १,०४,५४,०८०/- |
| ८ | मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं. १८५।३।४६ पै, सि.स.नं. १५०९ पै मधिल मंजूर विकास योजनेतील आ.क्र. ३६९ (बस टर्मिनल) या प्रयोजनाने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | आ.क्र. ३६९ (बस टर्मिनल) | २८०.००चौ.मी | १,०४,५४,०८०/- |
| ९ | मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं. १८५।३।४८ पै. सि.स.नं. १५०९ पै मधिल मंजूर विकास योजनेतील आ.क्र. ३६९ (बस टर्मिनल) या प्रयोजनाने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | आ.क्र. ३६९ (बस टर्मिनल) | २८०.०० चौ.मी | १,०४,५४,०८०/- |
| १० | मौजे सांगवी येथील स.नं. ९ अ पै मधिल मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्त्वाने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत. | १८.०० मी. रस्ता | २००.०० चौ.मी. | ४९,१६,६००/- |
| ११ | मौजे दापोडी येथील स.नं. २७ पै., सि.स.नं.१८५७ पै. मधिल मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.०३।०१ उद्यान या प्रयोजनाने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत. | आरक्षण क्र.०३।०१ उद्यान | १३४७.५८ चौ.मी. | १,४८,४३,१४६/- |
| | | | र.रु. | ७,४१,०१,८३६/- |

## ब) दि.०४।०२।२०२० च्या मा.खाजगी वाटाघाटी समितीमध्ये मंजूर झालेले विषय

| अ.क्र | विषय | रस्ता/आरक्षण | क्षेत्र (चौ.मी) | मुल्यांकन र.रु |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे रहाटणी येथिल स.नं. ५९।१ब।२।२ मधिल १२.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | १२.०० मी. रस्त्याने बाधित | ३१.४२ चौ.मी | १२,१६,५८२/- |
| २ | मौजे रहाटणी येथील स.नं.३७।३।४, सि.स.नं. १६१३ पैकी मधिल १२.०० मी. रुंद रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | १२.०० मी. रस्त्याने बाधित | ११६.०२ चौ मी | ४४,९२,२९४/- |
| ३ | मौजे वाकड येथील स.नं. १६०।६ मधिल आ.क्र. ४।११ जकात नाका या प्रस्तावाने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | आ.क्र. ४।११ जकात नाका | ३६७.०० चौ.मी. | ६९,९४,२८६/- |
| ४ | मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ८३।२।१।१, सि.स.नं. २४९१ पैकी मधिल आ.क्र. ३५५ (CPG) लहान मुलांचे खेळाचे मैदान या प्रयोजनाने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | आ.क्र. ३५५ (CPG) लहान मुलांचे खेळाचे मैदान | २७८.७९ चौ.मी. | ४४,३२,४८२/- |
| ५ | मौजे रावेत येथील स.नं. १२१।२ पैकी मधिल मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | १८.०० मी. रस्त्याने बाधित | ९३.७५ चौ.मी. | २८,१४,३७५/- |
| ६ | मौजे पिंपळे गुरव येथील नविन स. नं. ५१।१।१ मधिल मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रुंद रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | १८.०० मी. रुंद रस्ता | १०५.०० चौ.मी. | २५,७८,८००/- |
| ७ | मौजे पिपंळे गुरव येथील स.नं. ५१।१।९ पैकी मधिल मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रुंद रस्तायने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | १८.०० मी. रुंद रस्ता | १००.०० चौ.मी. | २४,५६,०००/- |
| ८ | मौजे पिपंळे गुरव येथील ५१।१।९ पैकी मधिल मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रुंद रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | १८.०० मी. रुंद रस्ता | ५०.०० चौ.मी. | १२,२८,०००/- |
| ९ | मौजे पिपंळे गुरव येथील स.नं. ५१।१।९ पैकी मधिल मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रुंद रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | १८.०० मी. रुंद रस्ता | ५०.०० चौ.मी. | १२,२८,०००/- |
| १० | मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ५१।१।१ पैकी मधिल मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत. | १८.०० मी. रुंद रस्ता | १०५.०० चौ.मी. | २५,७८,८००/- |
| ११ | मौजे पिंपरी येथील स.नं. ३२२।५ पैकी, सि.स.नं. ६७७६ पैकी मधिल मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रुंद रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत. | १८.०० मी. रुंद रस्ता | ८९.०० चौ.मी. | १५,००,६२९/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ६३।३।३०, सि.स.नं. १२४२, स.नं. ६३।३।४।४, सि.स.नं. १४७९ मधिल मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रुंद रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत. | १८.०० मी. रुंद रस्ता | १५०.०० चौ.मी. | ३६,८४,०००/- |
| | | | र.रु. | ३,५२,०४,२४८/- |
| | | एकुण अ +ब र.रु. | | १०,९३,०६,०८४/- |

तरी वरील तक्त्यात नमुद केलेल्या मुल्यांकन रक्कमेस व त्या अनुषंगाने लागणा-या मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, वकील फी व इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.१३/०५/२०२० चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.२) मनपाचे कोव्हीड-१९ कोरोना चे वॉर रूमचे कामकाजासाठी मे.भारत संचार निगम लि. यांचेकडून ३०० एम.बी.पी.एस. बँण्डविड्थ तीन महिने कालावधी करीता उपलब्ध करून देणेकामी निविदा न मागविता थेट पध्दतीने करारनामा न करता कामकाज करणेकामी येणारा खर्च र.रू.४,८३,१४४/- (अक्षरी र.रु.चार लाख, त्र्याऐंशी हजार एकशे चव्वेचाळीस फक्त) अधिक जी.एस.टी. सह कामकाज करणेस, आदेश देण्यात आलेले असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.३**)** मनपाची निविदा सूचना क्रमांक १४/२०१९-२० नुसार लघुत्तम निविदा धारक मे.मोनार्क टेक्नॉलॉजी (पुणे) प्रा.लि. यांना महानगरपालिकेचे सर्व्हर, फायरवॉल, स्टोरोज यांचे वॉरंटी एक वर्ष कालावधीकरीता वाढविणेसाठी येणारा खर्च र.रू.४८,६८,०००/-(अक्षरी र.रु.अठ्ठेचाळीस लाख अडूसष्ट हजार फक्त) (सर्व करासह) या दराने करारनामा करून कामकाज करण्यास व त्या अनुषंगाने येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.४) मनपाची निविदा सुचना क्रमांक १३/२०१७-१८ नुसार लघुत्तम निविदाधारक मे.टेक 9 सर्व्हिसेस यांचेशी झालेल्या करारनाम्यानुसार महानगरपालिकेचे अद्ययावत Primary Data Center चे कामास सहा महिने कालावधीकरीता कार्यान्वयीत ठेवणेचे कामकाजास मुदतवाढ देणेस व त्यासाठी येणारा खर्च प्रतितिमाही र.रु.१२,४७,४००/- (अधिक कर) या प्रमाणे सहा महिने कालावधीकरीता येणारा खर्च र.रु.२४,९४,८००/- (अक्षरी र.रु.चोवीस लाख चौ-याण्णव हजार चारशे फक्त) (अधिक कर) याप्रमाणे येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.५) मा.सचिव राज्य निवडणूक आयोग यांचेकडील क्रमांक रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.४४/का-५ दिनांक १० फेब्रुवारी २०२० चे आदेशान्वये राज्य निवडणूक आयोग ठरविले त्या निवडणूकीशी निगडीत सर्व उपाय योजना, प्रशिक्षण व क्षमता बांधणी, अभ्यास दौरे, संशोधन व विश्लेशन नवीन प्रयोग तसेच इतर तत्सम उपक्रम, निवडणूकीशी संबंधित साहित्य खरेदी, मतदान यंत्र खरेदी अथवा देखभाल दुरुस्ती अन्य तातडीच्या बाबी,

इत्यादीसाठी राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी ( १ सप्टेंबर २०१९ ते ३१ ऑगष्ट २०२४ या कालावधीकरीता) मागील सार्वत्रिक निवडणूकीतील मतदारांच्या संख्येनुसार तर प्रति मतदार र.रु.२.५० प्रमाणे एकूण अंशदान र.रु.२९,८०,२२३/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख, ऐंशी हजार, दोनशे तेवीस फक्त) इतके राज्य निवडणूक आयोगाकडे प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे जमा करणेकामी मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.६) मनपाचे " जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.३ व ४ खाजगीकरणाने चालविणे " या कामाकरिता दि.०५/०९/२०२० पर्यंतच्या मुदत वाढीच्या कालावधीसाठी व तसेच मा.आयुक्त सो. यांचे कडील आदेश क्र.काक/३/कावि/१५४/२०१८, दि.२८/०६/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत नियुक्त केलेल्या कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडील दिनांक २४ फेब्रुवारी २०१५ च्या अधिसूचनेनुसार दर महा किमान वेतन अदा करणेबाबत किमान वेतन कायदा १९४८ नुसार कामगारांची वेळोवेळी होणारी वेतनामधील दरवाढ गृहीत धरून येणा-या सुमारे र.रु.२७,८३,०००/- (सुधारित एकूण र.रु.२,६६,३७,२११/- - र.रु.२,३८,५४,८१६/- = र.रु.२७,८२,३९५/-) चे वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.७) मनपाचे "जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.२ व केमिकॅल हाउस खाजगीकरणाने चालविणे" या कामाकरिता दि.०५/०९/२०२० पर्यंतच्या मुदत वाढीच्या कालावधीसाठी व तसेच मा.आयुक्त सो. यांचे कडील आदेश क्र.काक/३/कावि/१५४/२०१८, दि.२८/०६/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत नियुक्त केलेल्या कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडील दिनांक २४ फेब्रुवारी २०१५ च्या अधिसूचनेनुसार दर महा किमान वेतन अदा करणेबाबत किमान वेतन कायदा १९४८ नुसार कामगारांची वेळोवेळी होणारी वेतनामधील दरवाढ गृहीत धरून येणा-या सुमारे र.रु.३६,८५,०००/- (सुधारित एकूण र.रु.३,३०,३०,८४३/- - र.रु.२,९३,४६,७६८/- = र.रु.३६,८४,०७५/-) चे वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.८) पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे हृदयरोग, कॅन्सर, किडनी, मेंदुचे आजार, दुर्धर आजार, गंभीर अपघातग्रस्त आणि दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रूग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पिडितांना अर्थ सहाय्य केले जाते. शासन निर्णय क्र.पीसीसी ३००६/१९९७ प्र.क्र.३९७/नवि-२२ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.१८/१२/२००७ अन्वये दरवर्षी २५,००,०००/- एवढे अनुदान देण्यास मान्यता दिलेली आहे. सन २०२०-२०२१ पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी यांना र.रू २५,००,०००/- (अक्षरी र.रू पंचवीस लाख फक्त) अदा करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.९) मनपाचे पर्यावरण विभागाकडे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी स्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर र.रु.३,५०,००,०००/- इतकी तरतुद उपलब्ध आहे. सदरचे लेखाशिर्षावरुन र.रु.१४,००,०००/- इतकी रक्कम अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर वर्ग करता येणे शक्य आहे. उपद्रव शोधक कर्मचा-यांच्या मानधनासाठी सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षासाठी अंदाजे र.रु. १२,००,०००/- इतकी तरतुदीची आवश्यकता आहे. त्यानुसार अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर मुळ अंदाजपत्रकात असणा-या तरतुदीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी स्थायी आस्थापना या लेखाशिर्षामधुन र.रु.१४,००,०००/- इतकी रक्कम अस्थायी आस्थापनेत वर्ग करता येईल. तरी अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षामध्ये र.रु. १४,००,०००/- वाढ करुन एकुण र.रु. १५,००,०००/- इतकी तरतुद वर्ग करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०२ नुसार मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१०) ज्या कम्युनिटी किचनना महापालिकेमार्फत परवानगी देण्यात आलेली आहे, अशा सामाजिक संस्था व सार्वजनिक मंडळांना महानगरपालिकेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेला गहू व तांदूळ तसेच महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांमार्फत डाळ, गोडतेल, मसाला, गॅस व भाजीपाला पुरविण्यात येतो. त्याकरिता सर्व क्षेत्रिय कार्यालयांना आदेश क्रमांक-प्रशा/1/कावि/616/2020 दिनांक 30/04/2020 अन्वये प्रत्येकी र.रु.300,000/- स्थायी अग्रिम धन मंजूर करणेत आलेले आहे. सदर संस्थांकडून जेवण तयार करुन घेऊन शहरातील गरजू नागरिकांना क्षेत्रिय कार्यालयनिहाय (निवडणूक प्रभाग निहाय) नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचा-यांमार्फत 2 वेळचे जेवण वाटप करण्यात येत आहे. सबब, शासनाचे निर्देशानुसार शहरातील बेघर / विस्थापित कामगार, परराज्यातील अडकलेले कामगार, निवारा केंद्र तसेच गरजू नागरिक यांची भोजन व्यवस्था करण्याकरिता शहरातील स्वत:हून पुढे येणा-या सामाजिक संस्था / सार्वजनिक मंडळे यांना कम्युनिटी किचन सुरु करण्यास व त्यांना महापालिकेमार्फत अन्नधान्य पुरवठा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडून प्राप्त होणार गहू व तांदूळ तसेच क्षेत्रिय कार्यालयांमार्फत डाळ, गोडतेल, मसाला, गॅस व भाजीपाला पुरविणेस व त्यासाठी क्षेत्रिय कार्यालयांना अदा करणेत आलेल्या स्थायी अग्रिम धन रकमेमधून खर्च करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. क्षेत्रिय कार्यालयास अदा करणेत आलेल्या स्थायी अग्रिम धन र.रु.300,000/- (अक्षरी र.रु.तीन लाख फक्त) मधून होणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.११) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.12/20/2019-20 अन्वये सन २०१९-२० करिता पिंपळे सौदागर पुल ते दापोडी एम.एस.गुरुत्ववाहिनी वरील देखभाल दुरुस्तीची कामे करणे, व्हाल्व्ह बदलणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.भराटे कन्स्ट्रक्शन नि.र.रू.41,68,394/- (अक्षरी र.रु.एकेचाळीस लाख अडूसष्ट हजार तीनशे चौ-याण्णव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.41,67,542/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.41,67,542/- पेक्षा 23.52% कमी म्हणजेच र.रु.31,87,336/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.852/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.31,88,188/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व

निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१२) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.4/12/2019-20 अन्वये क प्रभागातील नेहरूनगर व उपविभाग, भोसरी, मोशी, इंद्रायणी नगर उपविभागात आवश्यकतेनुसार डी.आय.पाईप व एच.डी.पी.ई.पाईप लाईन टाकणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.संजय कॉन्ट्रक्टर नि.र.रू.50,13,447/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख तेरा हजार चारशे सत्तेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.50,10,062/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.50,10,062/- पेक्षा 30% कमी म्हणजेच र.रु.35,07,043/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.3,385/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.35,10,428/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१३) पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.२४४ कोटी (अक्षरी र.रु.दोनशे चौव्वेचाळीस कोटी फक्त) तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट र.रु.१३३.५८ कोटी विविधप्रकारचे पासेस र.रु.१४.५९ कोटी बसेस खरेदी र.रु.३५.८३ कोटी व ई बस सबसिडी ६० कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून प्रतिमहा रक्कम रुपये ९ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेसपोटी र.रु.१.५० कोटी असे र.रु.१०.५० कोटी (अक्षरी र.रु.दहा कोटी पन्नास लाख फक्त) सन २०१९-२० च्या अंदाजित संचलन तूटीचे लेखापरिक्षण होऊन तूट कायम होईपर्यंत माहे एप्रिल २०२० ते फेब्रुवारी २०२१ अखेर ११ महिने अदा करावयाचे असल्याने व सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने त्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि.११ मार्च २०२० पासून कोव्हीड-१९ चा प्रादूर्भाव सुरू झालेला आहे. सदर विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी व त्यावर उपाययोजना करणेकामी तंत्रज्ञानाचा उपयोग करून योग्य प्रकारे नियोजन करणे आवश्यक आहे. त्याकामी केंद्र शासनाचे Ministry of Housing and Urban Affairs कडील दि.१६ एप्रिल २०२० रोजी ई-मेल प्राप्त झालेला आहे. त्यानुसार त्यांनी कोव्हीड - १९ बाबत उपाय योजना करणेकामी आवश्यक त्या सुचना केलेल्या आहेत. दि.१२

मार्च २०२० रोजी शहरामध्ये एकूण १२ कोव्हीड रूग्ण आढळून आलेले होते व सदरची संख्या ही देशातील सर्वात मोठी संख्या होती त्यामुळे कोव्हीड विषाणूवर नियत्रंण मिळविणेसाठी माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करून तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याने कामकाज करणेत आलेले आहे. सबब, मे.टेक नाईन सर्व्हिसेस चिंचवड यांना कोव्हीड - १९ विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी वॉर रूम करीता सेंन्ट्रलाईज्ड डॅशबोर्ड तयार करणेचे कामकाज व कोरोना कालावधी संपेपर्यंतच्या कालावधीसाठी दुरूस्ती व देखभालसह करारनामा न करता निविदा न मागविता थेट पध्दतीने करून र.रू.२५,००,०००/- (अधिक प्रत्यक्ष कर) चे कामाचे आदेश क्रमांक/मा.तं.वि/१२/कावि/१३९/२०२० दि.०८/०५/२०२० अन्वये देण्यात आलेला असल्याने त्याचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार अवलोकन करणे.

विषय क्र.१५) मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.7/2/2019-20. अन्वये इ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र.३ मधील मोशी गावठाण, डुडूळगांव, साई मंदिर, भोसरी येथील शास्त्री चौक परिसरातील चेंबर्सची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने देखभाल व दुरूस्ती करणेकामी मे.संकेत अनिल मेंगशेट्टी नि.र.रू.37,45,875/- (अक्षरी र.रु. सदोतीस लाख पंचेचाळीस हजार आठशे पंच्याहत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.37,25,362/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.37,25,362/- पेक्षा 32.99% कमी म्हणजेच र.रु.24,96,365/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.20,513/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.25,16,878/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१६) पिंपरी चिंचवड मनपाचे अ प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वर्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे या कामाची सद्यस्थितीत चौथ्या वर्षाची मुदत पुर्ण होत असल्याने पुढील १ वर्षाकरीता (पाचवे वर्ष) मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. तसेच सदर कामातील मुळ निविदा अटी व शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार २ वर्षांनंतर पुढील प्रत्येक वर्षासाठी निविदा दारात १०% वाढ करून देणेची तरतुद आहे. तिस-या व चौथ्या वर्षा करिता डिझेल व लेबरचे त्यावेळचे दर व निविदा भरले त्यावेळचे दर यांची तुलना करुन निविदा अटी व शर्ती प्रमाणे ठेकेदार यांना तिस-या व चौथ्या वर्षा करिता अनुक्रमे १०% व २० % दरवाढ देणेत आली होती. पाचव्या वर्षासाठी सध्या चालु असलेले डिझेल व लेबरचे दर व निविदा भरले त्यावेळचे दर याची तुलना करता " प्रपत्र ब" प्रमाणे निविदा स्विकृती योग्य दर

३९.४४% इतका जास्त येत आहे. सदरचा वाढीव दर पाहता निविदा अटी व शर्ती प्रमाणे ठेकेदार यांना पुढील १ वर्ष कालावधीसाठी चौथ्या वर्षापेक्षा १०% दरवाढ देणेस हरकत वाटत नाही. त्यानुसार पुढील एक वर्ष कालावधीसाठी ठेकेदार यांना १०% दरवाढ देऊन र.रू.१,३७,०१,८७०/- पर्यंत काम करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/५०४/२०२०
दिनांक – ०८/०५/२०२०

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.